**Corporate News:** April 3, 2015

# रत्तनइंडियाचा अमरावती औष्णिक वीज प्रकल्प पूर्ण

**मुंबई :** रत्तनइंडिया पॉवर लिमिटेडने अमरावतीमधील औष्णिक वीज प्रकल्पाचे पाचवे आणि शेवटचे युनिट सुरू केले आहे. याबरोबरच १३५० मेगावॉट क्षमतेचा हा वीज प्रकल्प संपूर्णपणे कार्यान्वित झाला आहे. या प्रकल्पातील प्रत्येक युनिटची क्षमता २७० मेगावॉट इतकी असून ३ युनिट अवघ्या ३९ दिवसांत सुरू करून रत्तनइंडियाने देशाच्या ऊर्जा प्रकल्पाचे बांधकाम आणि उभारणीच्या इतिहासामध्ये एक नवा अध्याय जोडला आहे. याआधीचे दोन युनिट अनुक्रमे ३ फेब्रुवारी आणि मार्च रोजी सुरू झाले. कंपनीच्या मालकीच्या अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडने अमरावतीच्या ऊर्जा प्रकल्पामधून ऊर्जा प्रेषण प्रणाली सुरू केली आहे. यामध्ये रेल्वे लाईनही पूर्णत्वास नेण्यात आली आहे.

**Prahaar**